साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २१ वा | सोमवार, दि. ०८/०६/२०२६ ते दि. १४/०६/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## आरोग्य विभागात समूपदेशनाद्वारे पारदर्शकपणे ४ हजार १९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी अंमलबजावणी

धुळे (जिमाका) – सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेत यंदा प्रथमच समुपदेशनाधारित, पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात आला. राज्यातील एकूण ४ हजार ५०६ बदलीपात्र कर्मचाऱ्यांपैकी ४ हजार १९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शिफारसी करण्यात आल्याने ही प्रक्रिया राज्य प्रशासनातील एक आदर्श उपक्रम म्हणून पुढे आली आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या सेवा ज्येष्ठता, पसंतीक्रम, दुर्गम भागातील सेवा, वैद्यकीय व कौटुंबिक परिस्थिती यांचा विचार करून बदली प्रक्रिया पार पडल्याने राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास, समाधान आणि सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, सचिव-२, आयुक्त आरोग्य सेवा यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) यांच्या प्रशासकीय नियोजनातून संपूर्ण प्रक्रियेचे बारकाईने नियोजन करण्यात आले. प्रत्येक परिमंडळासाठी स्वतंत्र वेळापत्रक, मार्गदर्शक सूचना, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, हरकतींचे तत्काळ निवारण आणि प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण यामुळे पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यात यश आले.

परिमंडळ कार्यक्रम प्रमुख, तसेच राज्यस्तरीय कार्यक्रम प्रमुख यांच्या उपस्थितीत स्तरावरील बदल्या समन्वयातून करण्यात आल्या, राज्यातील छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अकोला, नाशिक, कोल्हापूर, पुणे, लातूर आणि ठाणे या परिमंडळांसह विविध विशेष आरोग्य संस्थांमध्ये १३ ते २३ मे २०२६ दरम्यान समुपदेशन प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली. उपलब्ध आकडेवारीनुसार संभाजीनगर, नागपूर, नाशिक, पुणे, लातूर, कोल्हापूर, अकोला आणि ठाणे या सर्व परिमंडळांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदली शिफारसी करण्यात आल्या असून प्रक्रिया सुरळीत आणि वादविरहितपणे पार पडली. परिचारिका संवर्गातील १ हजार ५७५, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) संवर्गातील ८०८, कनिष्ठ लिपिक संवर्गातील १९७, औषध निर्माण अधिकारी संवर्गातील १६० आणि प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गातील १४९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या समुपदेशनाद्वारे निश्चित करण्यात आल्या. यामुळे अनेक वर्षांपासून अपेक्षित असलेल्या पारदर्शकतेच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे कर्मचारी संघटनांकडूनही समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या प्रक्रियेत रिक्त पदांची आणि बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली. राज्यस्तरीय निरीक्षकांची नियुक्ती करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख ठेवण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रिया ही विभागाच्या समाज माध्यमावर पारदर्शकपणे टाकण्यात आल्या व हजारो कर्मचाऱ्यांनी त्याला चांगला प्रतिसाद दिला परिणामी कोणत्याही प्रकारच्या संभ्रमाला किंवा गैरसमजाला वाव न देता प्रक्रिया पूर्ण करण्यात यश आले.

आरोग्य विभागातील अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया विश्वास निर्माण करणारी आणि न्याय्य असल्याची भावना व्यक्त केली आहे. शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रशासनासमोर कार्यक्षम व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण केला असल्याची प्रतिक्रिया विविधस्तरांतून व्यक्त होत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील बदल्यांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विश्वासार्हता आणण्याच्या दृष्टीने राबविण्यात आलेली ही समुपदेशन प्रक्रिया राज्य प्रशासनासाठी एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरत असून, भविष्यातील कर्मचारी व्यवस्थापनासाठीही दिशादर्शक ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वाचे पाऊल मानला जात आहे. यावर्षी बदली प्रक्रियेत कर्मचाऱ्यांचाही चांगला प्रतिसाद व सहकार्य मिळाले त्यामुळे या बदल्या अधिक नियोजनबद्ध व सर्वांच्या सहयोगामुळे पारदर्शकपणे विभागाला करता आल्या अशी भावना संचालक, आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांनी व्यक्त केली आहे.असे जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात विविध कर्ज व अनुदान योजना राबविण्यात येत असून, या योजनांचा लाभ घेण्यासाठी हिंदु खाटीक समाजातील इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, धुळेचे जिल्हा व्यवस्थापक के. जी. जोपळे यांनी केले आहे. अनुसूचित जातीतील हिंदु खाटीक समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी राज्य शासनाने ५ जून २०२५ रोजी हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथील १४/ ए ११४ बी पहिला मजला, मित्तल चेंबर्स, नरीमन पॉइंट,मुंबई येथे कार्यरत असून जिल्हा व प्रादेशिक स्तरावरील कामकाज महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षांसाठी धुळे जिल्ह्यास अनुदान योजना २, बीजभांडवल योजना २, थेट कर्ज योजना २, एनएसएफडीसी सुक्षपत पुरवठा योजना १ तसेच एनएसएफडीसी उच्च शैक्षिणिक कर्ज योजना १ प्रमाणे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. या योजनांचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या हिंदु खाटीक समाजातील नागरिकांनी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंचन भवनच्या मागे, साक्री रोड, धुळे येथे संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री.जोपळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

## शिवसेना ओबीसी बाराबलुतेदार विभागाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुखपदी अनिल पाटील धमने तर महाराष्ट्र राज्य सोशल मिडीया प्रमुखपदी संजय कुसळकर

धुळे – महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा .डॉ . श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे, यांच्या मागदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. डॉ पी बी कुंभार यांच्या नेत्तृत्वाखाली व यांच्या सही निशी शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदी अनिल पाटील धमने यांची तर महाराष्ट्र राज्य सोशल मिडीया प्रमुख पदी संजय कुसळकर यांची नियुक्ती पत्रा द्वारे नियुक्ती देऊन निवड करण्यात आली .ङ्गअसून गेल्या २ वर्षा पासून अनिल पाटील धमने व संजय कुसळकर हे शिवसेना पक्ष वाढीसाठी सक्रिय सहभाग घेऊन शिवसेना ओबीसी व्हिजे एनटी नांदेड जिल्हाप्रमुख व महाराष्ट्र राज्य निवड समिती वर अनिल पाटील धमने यांनी तर संजय कुसळकर हे या पुर्वी ही धुळे जिल्हा प्रमुख व सोशल मिडीया राज्य प्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य निवड समिती सदस्य या पदावर चांगल्या प्रकारे शिवसेना पक्षाची ताकद वाढवण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात शिवसेना जिल्हाप्रमुख यांच्या निवडी असतील किवा ओबीसी विभागातील प्रत्येक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेणे व महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील ओबीसी संघटन मजबुत करण्याचे काम सातत्य पुर्ण करीत आहेत त्या मुळे त्यांनी शिवसेना पक्षात आजवर केलेल्या उल्लेखनिय कार्याची





दखल घेऊन अनिल पाटील धमने यांची महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदी तर संजय कुसळकर यांची महाराष्ट्र राज्य सोशल मिडिया प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे .

अनिल पाटील धमने हे गेल्या २८ वर्षा पासून राजकिय . सामाजिक . पत्रकारीता क्षेत्रात एक वजनदार व्यक्ती म्हणुन परिचित असून त्यांचे शिवसेना ओबीसी विभाग महाराष्ट्र राज्या मध्ये प्रत्येक जिल्ह्यात चांगली पकड असल्याचे दिसून येते त्यामुळे त्यांचे कार्य कौशल्य बघुन त्यांना पक्षाचे संघटन वाढवण्यासाठी मोठी जबाबदार देण्यात आली आहे तर संजय कुसळकर हे पण गेल्या अनेक वर्षा पासून धुळे जिल्ह्यासह महाराष्ट्रात त्यांचे पण चांगला प्रकारे संघटनात्मक काम असल्यामुळे त्यांना नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष ॲड . डॉ पी बी कुंभार यांच्या सही निशी देण्यात आले असून या नियुक्ती पत्रावर वंदनीय हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त करून आपणास पुढील कार्यास शुभेच्छा देत असा उल्लेख नियुक्ती पत्रात केलेला आहे या निवडी बद्दल शिवसेना ओबीसी पालघर जिल्हाप्रमुख सचिन धायगुडे, नवी मुंबई जिल्हाप्रमुख अनिल राठोड, यवतमाळ जिल्हाप्रमुख ॲड किशोर राठोड, धाराशिव जिल्हाप्रमुख कमलाकर दाणे, सोलापुर जिल्हाप्रमुख सुयश कर्चे, परभणी जिल्हाप्रमुख मदन रेणगडे, हिंगोली जिल्हाप्रमुख बंटी राठोड, गडचिरोली जिल्हाप्रमुख पुंडलीक येवले, पुणे जिल्हा प्रमुख विजय जाधव, नांदेड जिल्हाप्रमुख राजकुमार श्रीरामवार, शंकर नांदेडकर, संतोष बारसे, संजय सोनकांबळे, हर्षराज सोनवणे, लोभाजी गवारे, सोम भारती महाराज, बालाजी आचमे, विजय पांचाळ, गणेश जिंदम, राजू कऱ्हाळे यांच्या सह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील ओबीसी जिल्हाप्रमुख यांनी व सामाजिक राजकिय क्षेत्रासह अनेक मित्र मंडळीनी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला जात आहे .

# राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार कायदा; सक्षम पणन सुधारणांचा नवा अध्याय

# शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी मुंबई आणि नागपूर राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अस्तित्वात

विशेष लेख...

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील पणन व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडवणारा राष्ट्रीय महत्वाचा बाजार (Market of National Importance) कायदा हिवाळी अधिवेशनात संमत झाल्यानंतर आता मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समित्यांना 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' घोषित करण्यात आले आहेत. कायद्यानुसार पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दोन्हीही राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. हा कायदा राज्यातील पणन व्यवस्था अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि अत्याधुनिक संसाधनांनी सुसज्ज करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

शेतकरी हित, बदलती अत्याधुनिक पणन व्यवस्था, वेगाने पुढे जाणारी जागतिक अर्थव्यवस्था आणि आधुनिक कृषी व्यापाराच्या गरजा लक्षात घेतल्या तर हा कायदा काळाची गरज असून सक्षम पणन सुधारणाचा नवा अध्याय आहे असे या कायद्याच्या उद्देशातून स्पष्टपणे दिसून येते.ङ्कङ्कराज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा १९६३ मध्ये अस्तित्वात आला. कोणताही कायदा कायमस्वरूपी अपरिवर्तनीय नसतो. बदलत्या काळानुसार, तंत्रज्ञानानुसार आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार त्यामध्ये सुधारणा कराव्याच लागतात. कृषी पणन क्षेत्रातील सुधारणांचा प्रवास पारंपरिक बाजार समित्यांपासून खासगी बाजारांपर्यंत झाला आणि आता त्याच सुधारणांचा पुढील टप्पा म्हणजे जागतिक पणन व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक पणन व्यवस्था असलेला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' ही संकल्पना आहे. या सुधारणांची बीजे २०२४-०५ पासून पेरली गेली. त्यानंतर २०१७-१८ मध्ये केंद्र सरकारने राज्यांना दिल्लीतील आझादपूर मंडीच्या धर्तीवर राष्ट्रीय स्वरूपाच्या बाजारपेठा विकसित करण्याची सूचना केली होती. विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची आवक होणाऱ्या बाजार समित्यांसाठी स्वतंत्र रचना तयार करण्याचा मसुदाही राज्यांना पाठविण्यात आला होता.

सध्याच्या बाजार समित्यांची रचना प्रामुख्याने स्थानिक प्रतिनिधित्वावर आधारित आहे. ज्या भागातून शेतीमालाची आवक होते त्या भागातील शेतकरी प्रतिनिधी निवडणुकीतून बाजार समितीवर निवडून येतात. परंतु मुंबई, नागपूर, नाशिक किंवा पुणे यासारख्या मोठ्या बाजारांमध्ये अनेक राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येतो. अशा परिस्थितीत केवळ स्थानिक प्रतिनिधित्व पुरेसे ठरत नाही. त्या बाजाराशी संबंधित इतर राज्यांतील शेतकरी आणि व्यापार घटकांचे व्यापक प्रतिनिधित्व गरजेचे आहे.ङ्कङ्कपणन हा राज्य सूचीतील विषय असल्यामुळे परराज्यातील शेतकरी प्रतिनिधींना निवडणुकीद्वारे बाजार समितीवर आणणे शक्य नाही. ही मर्यादा दूर करण्यासाठी राष्ट्रीय बाजार कायद्यात नामनिर्देशित संचालक मंडळाची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारनेही मोठ्या बाजारांसाठी तज्ज्ञ, अधिकारी, व्यापारी, शेतकरी प्रतिनिधी आणि इतर राज्यांतील सदस्यांचा समावेश असलेले संचालक मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली होती.

त्याच अनुषंगाने राष्ट्रीय बाजारांमध्ये निवडणुका न घेता पणन मंत्री अध्यक्ष, पणन राज्यमंत्री उपाध्यक्ष, तसेच वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, पणन संचालक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, अपेडा, शेतकरी प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेले संचालक मंडळ नियुक्त केले जाणार आहे. या मंडळाच्या माध्यमातून मोठ्या बाजारांचे व्यवस्थापन अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी परिणामकारक आणि राष्ट्रीय स्तरावरील गरजांशी सुसंगत होईल. राष्ट्रीय महत्वाचा बाजार म्हणून निवड होण्यासाठीही विशिष्ट निकष ठेवण्यात आले आहेत. किमान ८० हजार टन कृषी मालाची वार्षिक आवक असणे आणि किमान दोन राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात महत्त्वपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समिती समजल्या जाणाऱ्या मुंबई व विदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूर यांसारख्या मोठ्या बाजार समित्यांचे राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारात रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे व्यापक हित जोपासले जाणार आहे.

आज बाजार समित्यांना शंभर वर्षांहून अधिक काळ झाला असला तरी त्यांतील व्यवहारांची वाढ अपेक्षित प्रमाणात झालेली दिसत नाही. शेतमालाचे दर, सुविधा, पायाभूत व्यवस्था, अतिक्रमण, पारदर्शकता याबाबत अनेक तक्रारी सातत्याने होत असतात. अनेकदा निवडून आलेल्या संचालक मंडळांच्या अधिकारांनाही मर्यादा असतात. आता राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा दर्जा देण्यात आणि याचे अध्यक्ष थेट पणन मंत्री असल्याने बाजार समितीच्या कामकाजावर शासनाचा नियंत्रण राहणार आहे. यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि वेगवान कार्यक्षमता निर्माण होईल.ङ्कङ्कमोठ्या बाजारांमध्ये पणन मंत्री, पणन संचालक आणि तज्ज्ञ सदस्यांचा थेट सहभाग असल्यास धोरणात्मक निर्णय अधिक वेगाने घेता येतील, पायाभूत सुविधा जलद विकसित करता येतील आणि विविध राज्यांतील व्यापाऱ्यांची स्पर्धा वाढवून शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर मिळवून देता येतील.

बदलती अर्थव्यवस्था, वाढती जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यातक्षम फळे व भाजीपाल्याचे उत्पादन या सर्व बाबी लक्षात घेता, या क्षेत्रात मूलभूत सुधारणांची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन सातत्याने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून राज्याची कृषी आणि विपणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी हिताचे निर्णय घेत आहे. पणन मंत्री म्हणून जयकुमार रावल यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर कालसुसंगत, शेतकरी-केंद्रित आणि स्पर्धात्मक पणन रचना उभारण्यासाठी नियोजनपूर्वक दूरगामी पावले उचलली आहेत. या कायद्यामागील मुख्य उद्देश म्हणजे शेतमालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारी आधुनिक पणन व्यवस्था निर्माण करणे हा आहे. अत्याधुनिक संसाधनांनी युक्त अशा राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा उभारून त्यामार्फत शेतमाल जलद पुरवठा साखळीने महामुंबई इंटरनॅशनल ॲग्रीकल्चर मार्केटशी जोडला जाणार आहे. पॅरिस येथील रुंगीस आंतरराष्ट्रीय मार्केटच्या धर्तीवर वाढवण बंदराजवळ सुमारे १२०० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे बाजार केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. त्यादृष्टीने शासन पावले उचलत आहे. या इंटरनॅशनल मार्केटच्या माध्यमातून ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग, मार्केटिंग, लॉजिस्टिक सुविधा व जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून राज्यात उत्पादित फळे, भाजीपाला व इतर शेतमाल अवघ्या १२ ते १४ तासांत आंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचवणे शक्य होणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले आणि स्थिर दर मिळतील. राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठा, अधिक स्पर्धात्मक दर आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सुधारणांची आवश्यकता आहे. त्यामुळे या कायद्याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या कृषी पणन व्यवस्थेला नवे बळ देणारा आणि भविष्यातील बाजारपेठांसाठी सक्षम बनवणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

-बी.सी.झंवर, विभागीय संपर्क अधिकारी.

# अमरिशभाई पटेल पोलीस भरती केंद्र शिरपूर मार्फत एमपीएससी गट-ब पूर्व परीक्षेसाठी विशेष सराव परीक्षेचे आयोजनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरपूर - एस.व्ही.के.एम. संचालित केतकीबेन मुकेशभाई पटेल केंद्रीय ग्रंथालय, शिरपूर, श्री अमरिशभाई पटेल पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र, शिरपूर तसेच इग्नाइट स्पर्धा परीक्षा अकॅडमी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा दि. १४ जून रोजी होत असून सदर परीक्षेकरिता मोफत सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव मिळावा, तसेच आयोगाच्या अभ्यासक्रम व गुणपद्धतीची ओळख व्हावी या उद्देशाने श्रीमती केतकीबेन मुकेशभाई पटेल केंद्रीय ग्रंथालय, शिरपूर येथे ही सराव परीक्षा घेण्यात आली. सकाळी ११ ते १२ या वेळेत झालेल्या या उपक्रमात १०० हून अधिक स्पर्धा परीक्षा अभ्यासक विद्यार्थी सहभागी झाले. सराव परीक्षेनंतर प्रश्नपत्रिकेचे सविस्तर विश्लेषण इग्नाइट स्पर्धा परीक्षा अकॅडमी, पुणे यांच्या माध्यमातून सायंकाळी ६ वाजता यूट्यूब चॅनेलवर प्रसारित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे व शंकांचे ऑनलाइन मार्गदर्शन करून त्यांचे निरसन करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री अमरिशभाई पटेल पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र संचालक अन्साराम आगरकर, इग्नाइट स्पर्धा परीक्षा अकॅडमीचे संचालक धनंजय कचाले, व्यवस्थापक सतीश पाटील, अभिजित राठोड (पुणे), केतकीबेन मुकेशभाई पटेल केंद्रीय ग्रंथालयाचे उपग्रंथपाल अश्विन अमृतकर, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक विकास राजपूत, सुभाष पावरा, डॉ. कैलास पाटील, तुषार मारवाडी, विवेक पाटील, निखील पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.



या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल एस.व्ही.के.एम. अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, एस.व्ही.के.एम. सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, एस.व्ही.के.एम. उपाध्यक्ष तथा लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांनी समाधान व्यक्त केले. तसेच शिरपूर तालुक्यातील युवक-युवतींनी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील प्रशासकीय सेवांमध्ये यश संपादन करून नेतृत्व करावे, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य व मार्गदर्शन देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

# आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे नव्या जागेत स्थलांतर

धुळे (जिमाका) - एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे यांचे कार्यालय १ जून, २०२६ पासून नव्या जागेत स्थलांतरित करण्यात आले आहे. अशी माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. पूर्वी हे कार्यालय प्लॉट क्रमांक २४,बडगुजर प्लॉट, राम सर्जिकल इमारतीच्या शेजारी ८० फुटी रोड, धुळे येथे कार्यरत होते. आता हे कार्यालय आता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे, आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह (जुने गंगाई ), धुळे साक्री रोड, सिंचन भवनाच्या पाठीमागे, धुळे येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, आदिवासी बांधव, विद्यार्थी ,पालक तसेच विविध शासकीय योजनांचे लाभार्थी यांनी कार्यालयीन कामकाज,अर्ज सादर करणे, प्रमाणपत्रे, शिष्यवृत्ती, वसतिगृह कामकाजासाठी नव्या पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी श्री. पाटील यांनी केले आहे.

# धुळे व नंदुरबार पोस्ट कार्यालयात आधार नोंदणी व पासपोर्ट नूतनीकरण सेवा उपलब्ध

धुळे (जिमाका) – धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील नागरिकांच्या सोयीसाठी शहर व परिसरातील विविध पोस्ट कार्यालयांमध्ये आधार नोंदणी, नवीन पासपोर्ट , पासपोर्ट नूतनीकरण अशा अद्ययावत सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. अशी माहिती प्रवर अधीक्षक डाकघर, धुळे विभाग यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या केंद्रांवर नवीन आधार नोंदणी, नाव, पत्ता, जन्मतारीख दुरुस्ती, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत करणे तसेच बायोमेट्रिक अपडेट करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. धुळे जिल्ह्यातील कार्यालय – धुळे मुख्य टपाल कार्यालय, धुळे सब पोस्ट ऑफिस धुळे सिटी, धुळे सब पोस्ट ऑफिस, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे सब पोस्ट ऑफिस, जयहिंद कॉलनी, धुळे सब पोस्ट ऑफिस, विद्यानगरी, देवपुर धुळे सब पोस्ट ऑफिस, साक्री ता. साक्री सब पोस्ट ऑफिस, शिरपूर ता. शिरपूर सब पोस्ट ऑफिस, स्टेशन रोड, धुळे सब पोस्ट ऑफिस, दोंडाईचा ता. शिंदखेडा सब पोस्ट ऑफिस, पिंपळनेर ता. साक्री सब पोस्ट ऑफिस, शिंदखेडा ता. शिंदखेडा

नंदुरबार जिल्ह्यातील कार्यालय – सब पोस्ट ऑफिस, नंदुरबार सब पोस्ट ऑफिस, नवापूर ता. नवापूर सब पोस्ट ऑफिस, तळोदा ता. तळोदा सब पोस्ट ऑफिस, अक्कलकुवा ता. अक्कलकुवा सब पोस्ट ऑफिस, धडगाव ता. धडगाव सब पोस्ट ऑफिस, शहादा ता. शहादा तसेच धुळे मुख्य टपाल कार्यालय,धुळे तसेच सब पोस्ट ऑफिस, नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालय ,नंदुरबार येथे नवीन पासपोर्ट तसेच नूतनीकरण सेवा उपलब्ध आहे. नागरिकांनी जवळच्या पोस्ट कार्यालयात जाऊन आधार सेवांचा लाभ घ्यावा. सर्व केंद्रांवर प्रशिक्षित कर्मचारी तसेच कार्यरत आधार किट्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवर अधीक्षक डाकघर, धुळे विभाग यांनी केले आहे.

# आर. सी. पटेल फार्मसी स्वायत्त महाविद्यालयातील बी.फार्मसी परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी, गुणवत्तेत उज्वल यश

शिरपूर – आर. सी. पटेल फार्मसी स्वायत्त महाविद्यालय शिरपूर द्वारे घेण्यात आलेल्या २०२५–२०२६ शैक्षणिक वर्ष मे–२०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून त्यात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. द्वितीय वर्ष बी. फार्मसी मध्ये भालसिंगे अभिजित अर्जुन याने ९.११ सी.जी.पी.ए. मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. माळी स्नेहा भटू व अर्पिता कुमारी ८.७६ सी.जी.पी.ए. द्वितीय, चौधरी पूजा अनिल ८.६० सी.जी.पी.ए. तृतीय क्रमांक मिळवला आहे.

तृतीय वर्ष बी. फार्मसी मध्ये श्रुती सुनील कुमार झा हिने ९.१६ सी.जी.पी.ए. मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. यज्ञी मधुकर वडिले ९.०५ सी.जी.पी.ए. सह द्वितीय क्रमांक पटकावला. पवित्राकर तन्वी नितीन आणि शिंदे सायली शरद या दोघींनीही ८.८० सी.जी.पी.ए. मिळवत संयुक्त तृतीय क्रमांक पटकावला.

अंतिम वर्ष बी. फार्मसी मध्ये गोकलानी अचल जयकुमार हिने ८.९० सी.जी.पी.ए. मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. काळे जागृती विनोद ८.७१ सी.जी.पी.ए. सह द्वितीय क्रमांक, अग्रवाल मैथिली विजय ८.६९ सी.जी.पी.ए. सह तृतीय क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, सर्व विभागप्रमुख, रजिस्ट्रार जितेश जाधव, सर्व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर, आदींनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालींसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जागतिक पर्यावरणदिनी ओम नगर मध्ये हरित संकल्प

शिरपूर – जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ओम नगर मांडळ शिवार, शिरपूर यांच्या वतीने ओम नगर येथील ओपन स्पेसच्या परिसरात वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संरक्षण, संवर्धन आणि हरित भविष्यासाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, युवक, महिला व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी कडुनिंब, पिंपळ, आंबा, जांभूळ, करंज, अशोक, गुलमोहर आदी देशी व औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली. एक झाड – एक जबाबदारी हा संदेश देत उपस्थितांनी लावलेल्या प्रत्येक झाडाच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली.

[illegible] सदस्य प्रतीश सोनवणे यांनी विशेष उपस्थिती दर्शवून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी नागरिकांना अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

# झेंडेअंजन येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयातर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध कार्यक्रम




शिरपूर – तालुक्यातील झेंडेअंजन येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयातर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते वृक्षांचे पूजन करून शालेय परिसरात विविध वृक्ष लागवड करण्यात आली. कार्यक्रमात वृक्ष संवर्धन व संगोपन बाबत विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष झेंडेअंजन गावाचे सरपंच रेखाताई भरत देशमुख होते, प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चैत्राम रघुनाथ गायकवाड व मुख्याध्यापक पी.एन.गोसावी होते. त्यांनी जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले,पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे, प्रदूषण, हवामान बदल आणि जैवविविधता संवर्धन यांसारख्या समस्यांकडे लक्ष वेधणे, वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि स्वच्छता उपक्रमांना प्रोत्साहन देणे शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी प्रेरणा देणे यासाठी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो असे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रेखाताई देशमुख यांनी झाडे लावा व त्यांचे संगोपन करा, प्लास्टिकचा वापर कमी करा, पाण्याची बचत करा कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमात माता पालक संघाचे अध्यक्ष ज्योती गवळी, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष भरत देशमुख ग्रामसेवक भावसार दिवान तसेच इयत्ता दहावीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर. एफ. बागुल यांनी केले. आभार सी. एस. पावरा यांनी मानले.

# धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या तालुकास्तरीय टॅलेंट सर्च उपक्रमाचे भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते शानदार उद्घाटन



शिरपूर – ग्रामीण व तळागाळातील क्रिकेट प्रतिभेला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे प्रथमच जिल्हाभर तालुकास्तरीय टॅलेंट सर्च अभियान राबविण्यात येत असून या अभिनव उपक्रमाची सुरुवात शिरपूर येथून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल आणि सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला आहे.

शिरपूर येथील आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या मैदानावर धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते तालुकास्तरीय टॅलेंट सर्च चे शानदार उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे ज्येष्ठ सल्लागार प्रकाश पाटील, ड. प्रमोद क्षिरे, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, जिल्हा असोसिएशनचे सचिव प्रितेश पटेल, जिल्हा निवड समिती सदस्य लहू पाटील (ज्यु.), राजेंद्र बारे उपस्थित होते. यावेळी बोलताना भूपेशभाई पटेल यांनी सांगितले की, टॅलेंट सर्चच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी भागातील गुणवान क्रिकेटपटूंना शोधून त्यांना एकत्रितपणे वर्षभर मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. धुळे जिल्ह्यात दर्जेदार क्रिकेटपटूंची कमतरता नसून त्यांना योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील अनेक होतकरू खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

टॅलेंट सर्च चे वैशिष्ट्य म्हणजे शिरपूर तालुक्याच्या अतिशय दुर्गम भागातील, पाड्यावरील आदिवासी क्रिकेटपटूनी मोठ्या प्रमाणावर आपला सहभाग नोंदविला आहे. तालुक्यातून सुमारे २२५ खेळाडूंनी नोंदणी केली असून आज १४ व १६ वर्षाखालील १२६ खेळाडूंची चाचणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित १९, २३ वर्षाखालील व खुला गट तसेच महिला खेळाडूंची चाचणी उद्या होणार आहे. कडक उन्हाळा असून सुद्धा दिवसभर खेळाडू व पालक यांचा उत्साह पाहण्या सारखा होता. टॅलेंट सर्च आयोजित केल्याबद्दल पालक वर्ग यांनी जिल्हा असोसिएशनचे आभार मानून समाधान व्यक्त केले. धुळे जिल्ह्यात टॅलेंट सर्च मोहीम राबविली जात असून दि. १० व ११ जून रोजी एस.व्ही.के.एम. स्कूल धुळे, दि. १३ जून हस्ती पब्लिक स्कूल दोंडाईचा, दि. १४ जून व्ही. के. पाटील इंटरनॅशनल स्कूल शिंदखेडा, दि. १९ ते २० रोजी तालुका क्रिडा संकुल साक्री येथे पुढील आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण, आदिवासी आणि दुर्गम भागातील क्रिकेट प्रतिभेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनने हाती घेतलेला हा उपक्रम जिल्ह्यातील क्रिकेट विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे.

# एच. आर. पटेल फार्मसीत विश्व पर्यावरण दिनानिमित्त ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात संपन्न

शिरपूर – विश्व पर्यावरण दिन २०२६ निमित्त शिरपूर येथील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदल आणि शाश्वत विकासाविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून स्पर्धेत १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेमध्ये पर्यावरण संरक्षण, जैवविविधता, हवामान बदल, अक्षय ऊर्जा, प्रदूषण नियंत्रण, जलसंवर्धन, कचरा व्यवस्थापन तसेच शाश्वत जीवनशैली यांसंदर्भातील विविध प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणीय समस्यांविषयी सखोल माहिती मिळाली तसेच पर्यावरण संरक्षणासाठी वैयक्तिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली. स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून कुणाल बोरसे याने प्रथम क्रमांक पटकावला. ललित गिरासे द्वितीय क्रमांक, तेजस मराठे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. विजेत्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी आपल्या संदेशात सांगितले की, पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची किंवा सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. वाढते प्रदूषण, जंगलतोड, हवामानातील बदल आणि नैसर्गिक संसाधनांचा होणारा अतिवापर यामुळे पर्यावरणासमोरील आव्हाने दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक जीवनशैली



स्वीकारून समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयामार्फत पर्यावरण संवर्धनासाठी नियमितपणे विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त परिसर अभियान, डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करून कागद बचत, जलसंवर्धन, ऊर्जा बचत, कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर व पुनर्चक्रण यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. पर्यावरणाचे संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन ही काळाची गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या उपक्रमाचे समन्वयन प्रा. एच. टी. जाधव, प्रा. के. एस. राजपूत आणि प्रा. एस. व्ही. पाटील यांनी केले. हरित विचार, हरित कृती आणि हरित जीवनशैली या संकल्पनेद्वारेच शाश्वत आणि समृद्ध भविष्याची निर्मिती शक्य आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# जिल्हा वार्षिक योजनेचे परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावेत–जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

धुळे (जिमाका) – जिल्हा वार्षिक योजना, आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत सन २०२६–२७ या वर्षासाठी मंजूर झालेल्या नियतव्ययाची सविस्तर माहिती घेऊन सर्व विभागांनी आवश्यक विकास कामांचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले. जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजनांची आढावा बैठक आज सकाळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते बोलत होत्या. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, निवासी उपजिल्हाधिकारी महादेव खेडकर, प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, कार्यकारी अभियंता

## *जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक*

आर.आर.पाटील जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, उपजिल्हाधिकारी संजय बागडे, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक (शिरपूर) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, प्रत्येक विभागाने सन २०२६–२७ करिता मंजूर नियतव्ययाचा अभ्यास करून प्रस्तावित योजना, प्रलंबित कामे आणि उपलब्ध निधीचा विचार करून वर्षाचे संपूर्ण नियोजन तयार करावे. विकास कामांच्या तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव तातडीने सादर करून प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या मागील बैठकीतील कार्यपालन अहवाल सादर करावा. वन विभागाने वन समिती मेळावे व कार्यशाळांचे नियोजन करावे. पोलीस विभागाने २४ नवीन पोर्टेबल पोलीस चौक्या, नवीन वाहने तसेच महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीचे प्रस्ताव तयार करावेत. गतवर्षी पूर्ण झालेल्या विकास कामांची जिओ–टॅग छायाचित्रे आणि व्हीडिओ सादरीकरणासाठी पाठवावीत. तसेच सर्व पूर्ण झालेल्या कामांना यूडीआयडी देण्यात यावा. विकास कामांचे प्रस्ताव तयार करताना ज्या भागांमध्ये अद्याप मूलभूत विकास कामे झालेली नाहीत, अशा भागांना प्राधान्य द्यावे. गतवर्षीच्या जिल्हा विकास आराखड्यातील मंजूर कामे तातडीने पूर्ण करावीत. तसेच चालू वर्षाच्या जिल्हा विकास आराखड्यासाठी सर्व विभागांनी आवश्यक प्रस्ताव आणि नियोजन वेळेत सादर करावे, असे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी श्री. सोनार यांनी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत उपलब्ध निधी व खर्चाचा आढावा सादर केला. बैठकीत चालू वर्षातील मंजूर निधी, झालेला खर्च आणि आगामी वर्षाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)